कर्मचारी बंधु आणि भगिनींनो,

PGWFI (Petroleum & Gas Workers' Federation of India),AITUC (All India Trade Union Congress),HMS (Hind Mazdoor Sabha),CITU (Centre Of Indian Trade Unions),AITUC (All India United Trade Union Centre), TUCC (Trade Union Coordination Centre), SEWA (Self Employed Women's Association), AICCTU (All India Central Council of Trade Unions),LPF (Labour Progressive Federation), UTUC (United Trade Union Congress) यांच्यासह भारतातील स्वतंत्र क्षेत्रीय महासंघ / कामगार संघटना यांनी दिनांक २८ व २९ मार्च २०२२ रोजी दोन दिवसीय देशव्यापी संप पुकारला आहे. केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणाचा निषेध म्हणून ओ.एन्.जी.सी. (WOU) कर्मचारी संघटना देखील यामध्ये सहभागी झाली असून, कर्मचारी संघटनेने याबाबतचे नोटीस क्र.ONGC/KS/33/2022 दि.१५.०३.२०२२ रोजी ओ.एन्.जी.सी. व्यवस्थापनास दिले आहे.

दिनांक २८.०३.२०२२ व २९.०३.२०२२ रोजी मुंबई ऑफशोरला करावयाच्या कार्यक्रमाची रूपरेषा पुढील प्रमाणे:-

१) २८.०३.२०२२ व २९.०३.२०२२ :- काळ्या फिती लावून निषेध करणे.

२) २९.०३.२०२२ :- सकाळी ०७:०० ते सायंकाळी ०७:०० वा.पर्यंत सामूहिक अन्न त्याग (Food Boycott)

केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणाच्या निषेधाचे प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे:-

१)कर्मचारी वर्गास जाचक Labour Code

२) केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे खाजगीकरण व निर्गुंतवणूक धोरण

३) मनरेगा ( महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा) निधीमध्ये वाढ न करणे.

४) पेट्रोलियम वस्तूंवरील विविध केंद्रीय कर

५) रोजगार निर्मिती

६) NPS रद्द करून पूर्वीची GPF  पेन्शन योजना पुन्हा सुरू करणे.

आपण बहुसंख्येने आपल्या हितासाठी सामील व्हावे ही आपणा सर्वांस नम्र विनंती.



२७ मार्च २०२२

**(प्रदीप मयेकर)**
**सरचिटणीस**

**कर्मचारी संघटना झिंदाबाद !**
**कामगार एकता झिंदाबाद !**